महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद– ४३१ ००५

दुरध्वनीक्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

ईमेल:roaurangabad@dtemaharashtra.gov.in, website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/आस्था-३/२०२१/ 2199 दिनांक : 19 AUG 2021

## कार्यालयीन आदेशः

**संदर्भ** :- १. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. जीईसी/३३९७/७३७६/ताशि-१, दि. १०-०४-१९९७.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.

३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र.संकिर्ण-२०१५/(०१/१५) मशि-१, दि.२५-०५-२०१५.

४. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि.०९-०४-२०१८.

५. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्रक्र. १२/आस्था/बदल्या/२०२१/५७, दि. ०१/०२/२०२१.

६. सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन-१२, दि.२९-०७-२०२१.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील (सन २००६ महा. २१) च्या कलम ७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, दिनांक २८/०५/२०१५ च्या अधिसुचनेद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट-ड साठी बदली करणारे सक्षम प्राधिकरण म्हणून विभागीय सहसंचालकांना पद निर्देशित करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था/कार्यालयातील गट-ड संवर्गातील खालील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी विभागांतर्गत विनंती बदली करण्यात येत असून स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदलीनंतर पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **प्रयोगशाळा परिचर** | | |
| १ | श्री. नथ्थु सुखबीर चावरीया, प्रयोगशाळा परिचर, शासकीय तंत्रनिकेतन, अंबड | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या हमाल पदावर | विनंती बदली |
| २ | श्री. शिवाजी शंकर अंभोरे, प्रयोगशाळा परिचर, शासकीय तंत्रनिकेतन, जालना | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या प्रयोगशाळा परिचर पदावर | विनंती बदली |

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदलीनंतर पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **प्रयोगशाळा परिचर** | | |
| ३ | श्री. दगडु फत्रु सोनवणे,<br>प्रयोगशाळा परिचर,<br>शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे रिक्त असलेल्या हमाल पदावर | विनंती बदली |

सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त दि. ३१-०८-२०२१ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेच्या आस्थापनेवर काढावे. त्यांनतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदली पुर्वीच्या संस्थकेडून/आस्थापनेकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबधित कर्मचारी बदलीच्या संस्थेत रुजू झाल्यानंतर बदलीनतरंच्या संस्थेने/आस्थापनेने काढावे. दि.०१-०९-२०२१ पासूनचे वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील/आस्थापनेतील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

उपरोक्त कर्मचाऱ्यांनी बदली करण्यात आलेल्या संस्थेत/कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचाऱ्यांची बदली त्यांच्या विनंती वरुन करण्यात आलेली असल्यामुळे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**प्रत, माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१ मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२ मा. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, औरंगाबाद/जालना/हिंगोली यांना (मानार्थ) सादर.
३ मा. उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, अंबड यांना (मानार्थ)
४ प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय, औरंगाबाद.
५ प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/अंबड/हिंगोली.
६ संबधित कर्मचारी (संस्था/कार्यालय प्रमुखामार्फत)
७ गोपनिय कक्ष
८ निवड नस्ती